‘तथापि’चा

# जिव्हाळा



अंक ४१, आक्टोबर-डिसेंबर २०१५

प्रिय साथी,

सप्रेम नमस्कार! या नवीन वर्षात आपल्या आयुष्यात, घरात, समाजात विवेकी आचार-विचारांची समृद्धी येवो, प्रेमाचं, शांततेचं वातावरण नांदो, या मनपूर्वक शुभेच्छा!!!

जुन्यातून नव्यात जाताना मागचा हिशेब मांडणं आणि उद्याचं नियोजनही आलंच. सरत्या वर्षानं महाराष्ट्राला विशेषतः मराठवाड्याला दुष्काळ आंदण दिला आहे. त्याच्या झळा नव्या वर्षात सोसायच्या आहेत. चेन्नईतील पुरात स्वातंत्र्यप्राप्तीच्या ६०-७० वर्षांचं शहाणपण वाहून गेलं. कॉ. पानसरे आणि कलबुर्गीसारख्या क्रांतीप्रवण समाज सुधारकांवर झालेले भ्याड हल्ले पाहिले आणि येत्या वर्षात त्यांच्या हत्यांचा ‘तपास चालू आहे’ ची शासकीय पाटी ही पहायची आहे.

शिंगणापूरच्या शनिमंदिराच्या चौथऱ्यावरून एका मुलीने देवाला स्पर्श केला म्हणून तथाकथित धर्म उपासकांनी त्यावर दुधाचा अभिषेक करून शुद्धीकरण केले, ही घटना एव्हाना आपल्यापर्यंत पोचली असेलच. तरी अशा बुरसटलेल्या विचारांच्या वावटळीतही स्त्रीवादी, पुरोगामी, सकारात्मक आणि शास्त्रीय विचारांच्या बीजाला फुटलेला कोंब म्हणजे ‘हॅप्पी टू ब्लीड’ कॅम्पेन! म्हणजे रजस्वला होण्यातला आनंद व्यक्त करणारं अभियान! सोशल मिडीयाच्या माध्यमातून सर्वत्र पसरलेल्या या अभियानाला अनेक स्त्री-पुरुषांनी पाठिंबा दर्शवला, हे एक अर्थपूर्ण असं पुढचं पाऊलच म्हणावं लागेल. अशा अनेक पुढच्या पावलांनी येत्या वर्षाची वाटचाल करण्याची खूणगाठ आपण सर्वच जण मनाशी बांधूया...

हा अंक कोणते संदर्भ घेऊन साकारला आहे, ही उत्सुकता आपल्याला असेलच. दिवसागणिक तीव्र होत चाललेल्या मराठवाड्यातील आठही जिल्ह्यांच्या दुष्काळाच्या परिस्थितीचा आढावा या अंकातून आपल्यासमोर ठेवत आहोत. स्वयंसेवी संस्था, कार्यकर्ते यांनी आपापल्या जिल्ह्यातील सामान्य माणसाला समोर ठेवून हा आढावा दृष्टीक्षेपात आणला आहे. तसंच नुकताच डोळ्यांखालून गेलेला ‘मुंबई-पुणे-मुंबई २’ या सिनेमाचा विविध अंगांनी वेध घेणारा एक लेखही या अंकात प्रसिध्द करत आहोत आणि आपल्या सर्वांच्या लाडक्या कमळी-मंजुळीही एक इंटरेस्टिंग विषय घेऊन आल्या आहेत. अंक वाचा आणि तुमच्या प्रतिक्रिया आम्हाला जरूर कळवा.

**आपले**
**प्राजक्ता, अच्युत**

## अंतरंग

**मागोवा**

**आभाळंच फाटलंय.. ठिगळ तरी कुठे कुठे लावणार... २**
मराठवाड्यातील दुष्काळाचा आढावा

**पारगांवच्या पारावरुन**

**चुलीत घाल त्या मोबाईलला... ६**

**दृष्टिक्षेपात**

**मुंबई-पुणे-मुंबई २ - एक प्रतिक्रिया ९**
*गौरी बोबडे*

**शरीर साक्षरता**

**मतिमंद मुलं-मुली आणि वयात येणं... ११**
*सुभाष कळसे*




साभार : bamulahija.com

मा
गो
वा

# आभाळंच फाटलंय.. ठिगळ तरी कुठे कुठे लावणार...

## मराठवाड्यातील दुष्काळाचा आढावा

**आपण जाणतोच की राज्याच्या बऱ्याचशा भागात दुष्काळाचं सावट पसरलेलं आहे. सन २०१२-१३ च्या दुष्काळी स्थितीतून सर्वसामान्य माणूस सावरतोय तोच याही वर्षी मराठवाड्यात प्रचंड दुष्काळी स्थिती निर्माण झाली आहे. दुष्काळ आणि शेतकऱ्यांच्या आत्महत्या हे तर समीकरणच बनलं आहे. दुष्काळाच्या इतिहासात आणि वर्तमानात फारसा फरक नाही. लातूरमधील स्वातीने शाळेत जाण्यासाठी एस. टी. च्या पासाला पैसे नाहीत, म्हणून आत्महत्या केली, ही बातमी अनेकांनी ऐकली किंवा वाचली. एस. टी. परिवहन महामंडळाने मुलींसाठी स्वातीच्या नावाने मोफत पास योजनाही सुरु केली. पण प्रश्न हा आहे की अनेक दुष्काळ पाहिले पण आपण काही धडा घेतलाच नाही का? मराठवाड्याच्या जिल्ह्यांतील कार्यकर्त्यांशी बोलून प्रत्येक जिल्ह्यातील दुष्काळी परिस्थितीचा विशेषतः स्त्रियांच्या दृष्टिकोनातून आढावा घेण्याचा हा प्रयत्न...**

### लातूर जिल्हा

लातूर जिल्हा मुळात आवर्षण प्रवण जिल्हा म्हणून ओळखला जातो. मागील तीन वर्षांपासून दुष्काळ थैमान घालत आहे. पण कोणत्याही लोक प्रतिनिधीचे किंवा प्रशासनाचे या तालुक्याकडे लक्ष नाही. अनेक शेतकऱ्यांच्या आत्महत्यांच्या बातम्या आपण पेपरला वाचतोच आहोत.

आतापर्यंत ४-५ महिने शेतकरी घरात साठवलेले धान्य आणि जनावरे शेतातला मागील वर्षीचा चारा खाऊन कसेबसे जगले, पण आता या पुढची परिस्थिती खूपच भयानक असेल. ऑगस्ट महिन्यामध्ये शेतकऱ्याला थोडा दिलासा मिळाला होता. पण दुबार पेरणी केलेल्या शेतकऱ्यांचा सर्व्हे करण्यात आला होता. पण पुढारी लोकांचेच सर्व्हे करून घेतले तेही ग्रामपंचायतीत बसूनच. खरंच दुबार पेरणी करणारे शेतकरी मात्र त्यापासून वंचित राहिले. ग्रामपंचायतीत रोजगार हमीच्या कामाची मागणी केली तरी काम मिळत नाही. मजूरांच्या हाताला काम नाही आणि लहान मुले कमी पैशांत राबतात, त्यामुळे लहान मुलांचे मजूरी करण्याचे प्रमाण वाढू लागले आहे. लहान मुलांचे शिक्षण थांबले आहे. तर लोकांचे मजूरीसाठी स्थलांतराचे प्रमाण वाढले आहे.

लातूर जिल्हयात पिण्याच्या पाण्याच्या प्रश्नाने गंभीर स्वरूप धारण केलेलं आहे. मागील दोन महिन्यांपासून प्रशासन म्हणत आहे की, लातूरला रेल्वेने पाणी आणायचे. पण कधी मिळणार पाणी? गावात टँकरनेही पाणी मिळत नाही. कारण मागील तीन वर्षांपासून लातूरमध्ये पाऊसच नाही. भूजल पातळी ६०० फुटापेक्षाही खोल गेली आहे.

रात्री ३ वाजल्यापासून ते रात्री १२ पर्यंत मुली, बाया पाणी भरण्याच्या कामाला जुंपलेल्या दिसतात. पाण्याअभावी स्वच्छता नाही आणि स्वच्छेते अभावी अनेक महिलांना सांसर्गिक आजारांचा सामना करावा लागतो आहे. दुष्काळामुळे मुलींच्या शाळेला दांडी पडत आहे. रोज ४-५ किलोमीटर चालून डोक्यावर पाणी आणावे लागत आहे. शेतीची कामं, मुलांची देखरेख आणि घरातली कामं त्यात आता या कामाची भर पडली आहे. देवणी तालुक्यातील महिलांनी ऑगस्टच्या २६ तारखेला वरील प्रश्नी मोर्चाही काढला.

सततच्या दुष्काळामुळे जिल्हयातील जनावरांचे चाऱ्यावाचून अत्यंत हाल होत आहेत. या वर्षीच्या उन्हाळयात कर्नाटकातून ५० रू. एक पेंडी चारा आणला, तो पण अनेक वेळा हेलपाटे घालून. माणूस कसा तरी अन्न मिळवील, पण जनावरांना चारा मिळणे फार कठीण बाब आहे. मोठया शेतकऱ्यांनी अव्वाच्या सव्वा भावाने शेतातील ऊस तोडून जनावरांना घातला. पण गरीब शेतकऱ्यांच्या जनावरांचे खूप हाल होत आहेत. त्यांना जनावरे पाळता येईना आणि विकताही येईना. काही शेतमजूरांनी तर बेभावात जनावरे कत्तलखान्याला विकली.

शेती नापीक झाल्यामुळे मजूरांना आजिबात कामे नाहीत. कामे नसल्यामुळे शेतमजूरांचे स्थलांतर वाढत आहे. अन्नसुरक्षा योजनेअंतर्गत सध्या या भागातील सर्वच शेतकऱ्यांना रेशनिंग पुरवठा करावा असे आदेश जिल्हाधिकाऱ्यांनी दिलेले आहेत. परंतु अजून कोणालाही रेशन मिळालेले नाही. रेशन दुकानदार आणखीन याद्या करण्यावरच आहेत. गावपातळीवरील रेशन दक्षता समितीही भूमिका प्रभावीपणे निभावताना दिसत नाही. या रेशन दक्षता समित्या कार्यान्वित करणे आवश्यक आहे.

येत्या काळात जलस्त्रोतांमध्मे पाणीसाठा उरण्याची शक्यता नसल्यामुळे सर्वत्र चिंतेचे वातावरण आहे. त्यात शासनाच्या उदासिनतेची भर पडताना दिसत आहे.

*माहिती संकलन – ग्रामीण महिला विकास संस्था, देवणी.*
*पानफुल पाटील, गोविंद इंगळे, लातूर*

### उस्मानाबाद जिल्हा

मागील वर्षीपेक्षा या वर्षी पावसाचे सरासरी प्रमाण खूप कमी झाले. त्यातून रोजगाराचा प्रश्न निर्माण झाला आहे. काम मिळत नाही म्हणून खूप लोक चिंतेत आहेत. आज ही परिस्थिती, तर उन्हाळ्यात काय असेल? जनावारांचा चारा आत्ता थोडा उपलब्ध आहे, पण डिसेंबरनंतर तोही संपेल. बरीच लोकं जनावरे विकत आहेत. त्यातून

मिळणारे दुधाचे पैसे बंद झाले. त्यात व्यापारी जनावराची किंमत कमी लावत आहेत; असा दुहेरी फटका लोकांना बसत आहे.

तुळजापूर तालुक्यातील १५ गावातील महिलांनी २ ऑक्टोबर रोजी ग्रामसभेत जाऊन कामाची मागणी केली. पण अजून काम मिळत नाही असे दिसते. बऱ्याच गावात या अगोदर कामे झाली पण ती कामे मजूर लावण्याऐवजी जे. सी. बी. लावून करण्यात आली. त्यात अधिकारी कोणतीच पावले उचलताना दिसले नाहीत.



गावातील लोकांनी मिळून ग्रामसभेत दुष्काळाचा सामना करण्यासाठी पाणी जपून वापरण्याचा संकल्प केला. कामासाठी गावे सोडून लांब जावे लागत आहे. पहाटे उठून ट्रॅक्टरमधून गावापासून १५ किमी. लांब कामावर जातात. त्यात सकाळचे जेवण नीट होत नाही आणि ट्रॅक्टरमध्ये आदळत जाण्या-येण्याने अनेकांना कंबर आणि पाठदुखीचा त्रास सुरु झाला आहे.

सरकारने दुष्काळाच्या प्रश्नाकडे गांभीर्याने बघण्याची गरज आहे असे वाटते. जनावरांच्या चारा छावणीसाठी खूप जाचक अटी घातल्या आहेत. त्या सामान्य लोक पूर्ण करु शकत नाहीत. म्हणून जनावरांच्या चाऱ्याचा व पाण्याचा प्रश्न सुटत नाही.

*माहिती संकलन - बळीराम जेठे, कामधेनु, उस्मानाबाद*

## सोलापूर जिल्हा

पावसाने साथ दिली तरच या भागात शेती व्यवसाय होतो. अन्यथा सोलापूर जिल्ह्यातून रोजगारासाठी मोठ्या प्रमाणात शहरांकडे किंवा साखर कारखान्यांकडे स्थलांतर होते. या वर्षी या भागात अत्यल्प पाऊस झाला असून खरीप पूर्ण वाया गेला आहे.
शेवटच्या टप्प्यात परतीचा पाऊस थोडा-फार झाला. त्यावर रब्बीच्या पेरण्या थोड्या-फार झाल्या. पेरण्या झाल्यानंतर पाऊसच न झाल्याने रब्बी पिके पाण्याअभावी करपून चालली आहेत. ज्वारीचं पीक हाती येईल याची शाश्वती राहिलेली नसल्याने, खरीप पूर्ण वाया गेल्याने यावर्षी विशेषतः जानेवारी-जून या काळात पिण्याचं पाणी, अन्नधान्य, जनावरांना चारा, मजूरांच्या हाताला काम या प्रश्नांची व्याप्ती वाढतच जाणार आहे.

यावर उपाय म्हणून शासनामार्फत चारा छावण्या,पिण्याच्या पाण्यासाठी टँकर सुरु केले जात आहेत. मोठ्या शेतकऱ्यांना नुकसान भरपाई, कर्जमाफी दिली जाते, पण छोट्या शेतकऱ्यांना, भूमिहीनांना कसलीही मदत दिली जात नाही. गरीब कुटुंबांकडे चार-दोन शेळ्या असतात. पण या शेळ्यांना शासनाकडून चारा पुरवठा केला जात नाही. असलेल्या शेळ्या कशाने जगवायच्या या चिंतेने लोक अतिशय अल्प किंमतीत आठवडा बाजारात शेळ्या विकून टाकतात आणि साधनहीन होतात.

पिण्याचे पाणी आणणे, जनावरे राखणे यामध्ये कुटुंबातील मुली शाळेत पाठवल्या जात नाहीत. अनेक कुटुंबात मुलींच्या शिक्षणाचा खर्च कशाने करायचा यावर ताण-तणाव सुरु असतात. त्यातून गरीब कुटुंबात कौटुंबिक कलह निर्माण होतात आणि याचा परिणाम घरातील बाईवर अधिक प्रमाणत होतो.

अन्नधान्याच्या टंचाईमुळे काटकसर करण्यावर अधिक भर दिला जातो. त्यातून बाईवर उपासमार ओढवली जाते. परिणामी कुपोषण, आजारपण यासारख्या समस्या उद्भवतात. अशा काळात सरकारी आरोग्य व्यवस्थेने सक्षम सेवा देण्याची गरज असते. पण त्याही मिळत नाहीत. खाजगी दवाखान्याचा खर्च परवडत नाही. अशा स्थितीत आजारपण अंगावर काढण्याचे प्रमाण वाढते आहे.

दुष्काळाच्या या पार्श्वभूमीवर सरकारने रेशनिंग व्यवस्था सक्षम करण्यावर भर देणे, गावात रोजगार पुरवणे, पिण्याचे पाणी सहज उपलब्ध होईल अशी व्यवस्था करणे यावर भर देण्याची गरज आहे. तरच दुष्काळी स्थितीत गरिबांना दिलासा मिळू शकतो.

*माहिती संकलन -शहाजी गडहिरे, अस्तित्व संस्था, सोलापूर*

## जालना जिल्हा

जालना जिल्हा गेल्या चार वर्षापासून सातत्याने दुष्काळाच्या छायेत आहे. कधी ओला तर कधी कोरडा दुष्काळ. गेले चार महिने रोजगार नाही, हाताला काम नाही त्यामुळे पैसा नाही. रेशनचे धान्य पुरत नाही, अशी सर्वसामान्य शेतमजूर, शेतकरी यांची ओरड आहे.

जालना जिल्हयातील अंबड, जालना, बदनापूर या तालुक्यातील ग्रामीण जनता तणावाखाली दिसून येत आहे. शेतात पाणी नसल्यामुळे पिके हातची गेली. रोजगार हमीची कामे निरंतर सुरू नाहीत. शहरालगतच्या खेड्यांमधील पुरुष, महिला रोज शहरात कामाला येतात. बिगारी काम किंवा इतर कामे करुन संध्याकाळी दोन पैसे मिळवण्यासाठी धडपड करताना दिसून येत आहे.

गावातील पुढारी मंडळी व पंच, सरपंच ग्रामसभेच्या माध्यमातून कागदोपत्री सभा घेताना दिसून येत आहेत. दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर केंद्र व राज्यशासन काही अनुदान उपलब्ध करुन देते का याची वाट पाहत आहेत. दुष्काळाचा सर्वात मोठा फटका फळबागांना बसला आहे. फळबागा बाधित झाल्या आहेत. परवा एका गावात एका छोट्या शेतकऱ्याच्या बैलाने चाऱ्या-पाण्यावाचून प्राण सोडला. हे बळीराजा पाहू शकत नाही कारण तो पोटच्या पोरएवढेच जनावरावर प्रेम करतो.

शहरात बिगारी काम किंवा इतर कामे करुन महिला घराला हातभार लावण्याचा प्रयत्न करत आहेत. पुरुष वर्गाला काम मिळाले तर तो संध्याकाळी पगार घरात आणतो, पण कामच मिळाले नाही तर संध्याकाळी चुलीवर काय शिजवायचं हा प्रश्न महिलेच्याच समोर असतो. कधी पैसा मिळाला तरी अर्धा पैसा पुरुष व्यसनात घालवतात. या सगळ्या गोष्टीचा परिणाम मात्र बाईला भोगावा लागतो. या परिस्थितीत त्यांना आधार वाटतो तो बचत गटांचा. बचत गटाला या अवघड काळात मुद्दल देण्याची ताकद नसली तरी किमान व्याज भरुन निभावता येतं. ग्रामीण भागातील भगिनी कर्ज काढून किमान आजची गरज भागवण्याची धडपड करताना दिसून येत आहेत.

जालना जिल्ह्यात आतापर्यंत ७० ते ८० आत्महत्यांचा आकडा समोर आला आहे. सामाजिक संस्था, राजकीय पक्ष हे तात्पुरती मदत करताना दिसतात. पण एवढ्याशा तुटपुंज्या मदतीने फाटलेल्या आभाळाला ठिगळं कुठे कुठे लावणार?

***माहिती संकलन – विमल पाटील***

## बीड जिल्हा

बीड जिल्ह्यात या वर्षी काही भागात पाऊस झाला, काही भागात नाही झाला. त्यामुळं या जिल्ह्यातलं प्रमुख पीक असलेली बाजरी कुठं आली, तर कुठं नाही आली. तर नगदी पिकांमध्ये प्रमुख पीक असणाऱ्या कापसाच्या पीकात जेवढं भांडवल गुंतवलं तेवढं कसं तरी निघेल, पण हातात काहीच नसेल. माणसांना पाणी प्यायला नाही तर गुरांना कुठून सांभाळणार? चारा छावण्या आहेत पण थोडी–फारच जनावरं तिथं दिसतात. कारण ज्याची जनावरे आहेत, त्या घरातील एका व्यक्तीला छावणीच्या ठिकाणी जाऊन राहावं लागतं. तसेच जनावरांच्या संख्येचीही अट आहे. अशा अटी सगळ्यांना मान्य होतीलच असे नाही. जनावरांचे हाल आपल्या डोळ्याने बघण्यापेक्षा अल्पदरात का असेना पण जनावरे विकण्याचा पर्याय शेतकरी निवडताना दिसतात.

योजनांचा लाभ गावातील प्रत्यक्ष लोकांपर्यंत पोचत नाही. १० जनावरे असतील तर ५० जनावरे दाखवून गावातील पुढारी लोकच अनुदान लाटतात. मनरेगा योजनेंतर्गत मशीननेच कामे करून घेतली आणि कागदोपत्री मात्र माणसांची नावं लावलीयेत. लोकांपर्यंत एकही रुपया पोचत नाही. काही रोजगार उपलब्ध नसल्यामुळे सगळीच्या सगळी कुटुंबं ऊसतोडणीसाठी पश्चिम महाराष्ट्रात स्थलांतरित झाली आहेत.

याआधीही नुसत्या पाण्याच्या टाक्या बांधून ठेवल्या आहेत. पाईपलाईन मात्र केलेल्या नाहीत. योजना ज्या वर्षी राबवल्या, त्याच वर्षी त्या बंद पडल्या आहेत. विहिरी, तळी आटलेली आहेत. जास्तीत जास्त गावांमध्ये टँकरने पाणीपुरवठा केला जातोय. पाणी उपलब्ध असलंच तर खूप लांबून आणावं लागतं.

सरकारने जाहीर केलेले अनुदान हेक्टरनुसार आहे. अनुदान गरजेचे आहे. पण २०००, ३००० रु. अनुदानात काय होणार? तेही पुढारी लोक पोहचू देत नाहीत. सरकार कोणतेही असो वर्षानुवर्षे परिस्थिती वाईट होत चालली आहे.

गावात जागरूकता आणि एकी नाही. गावातला सावकार दारूच्या अड्ड्यावरच बसलेला असतो. तिथेच जुगारासाठीही तो कर्ज देतो. परिणामांना मात्र महिलांना सामोरे जावे लागत आहे. हिंसा आणि आर्थिक दुर्बलता या गोष्टींना तोंड द्यावं लागत आहे. दुष्काळामुळे महिलांची आर्थिक परिस्थिती कठीण झाली आहे. त्यामुळे नवीन महिला बचत गट तयार होत नाहीत आणि आहेत त्या गटांमध्ये आर्थिक उलाढालही होत नाही. कारण कर्ज फेडायला जमेल का या विचाराने आटोक्यातलीच कर्ज काढली जात आहेत.

***माहिती संकलन – शुभांगी कुलकर्णी, समता प्रतिष्ठाण***

## औरंगाबाद जिल्हा

या वर्षी पुरेसा पाऊस झाला नाही. औरंगाबाद जिल्ह्यातील जायकवाडी धरणात फक्त ६ टीएमसी पाणी आहे. पाण्याच्या अल्प साठ्यामुळे दुष्काळाचे भयाण संकट उभे राहण्याची शक्यता आहे. पूर्वीसारखी शेततळी आणि कुरणे उरली नाहीत. त्यामुळे जनावरांच्या चाऱ्याचा मोठा प्रश्न निर्माण झाला आहे. अशा दुष्काळाच्या परिस्थितीतही शासन धरणाचे पाणी अडवून उद्योगधंद्यांना मोठ्या प्रमाणावर पाणी पुरवठा करत आहे. वाळूंज एमआयडीसी प्रकल्पामुळे १८ गावं दूषित होत आहेत. कंपनीच्या कामामुळे झालेल्या प्रदूषणामुळे शेतातलं उभं पीक जळून गेलं. अशा प्रकारे शेतकरी चोहोबाजूंनी अडचणीत सापडला आहे.

पिण्याच्या पाण्याचा तुटवडा आहे. काही भागात टँकरनं पाणी विकत घ्यावं लागतं. ८–१५ दिवसांनी पाण्याचा टँकर येतो. लोकं पाणी भरुन ठेवतात. काही भागात सरकारी टँकरनं पाणी येतं. कापूस, तूर हे या जिल्ह्यातलं प्रमुख पीक आहे. जूनमधल्या पावसावर शेतकऱ्यांनी पेरण्या केल्या. पण त्या पिकांचा खर्च सुद्धा निघाला नाही. खरीप पीक थोडं–फार वाचलं म्हणता येईल. पण पाण्याअभावी रब्बी पिकांची पेरणी मात्र झाली नाही. शेतीवरच जास्तीत जास्त लोक अवलंबून आहेत. जानेवारी ते नोव्हेंबर २०१५ या काळात १२० शेतकऱ्यांच्या आत्महत्या झाल्या. सरकार फक्त घोषणांचाच पाऊस पाडत आहे. शासनाने लवकरात लवकर पीककर्जमाफ करावं.

जिल्ह्यात ग्रामीण मजुरांना काम नाही. जास्तीत जास्त लोक शहरांकडे स्थलांतर करत आहेत. यामध्ये लहान मुलं आणि महिलांची फरपट होत आहे. बोअरवेललाही पाणी नाही, इतकी पाण्याची पातळी खाली गेली आहे. विहिरींमध्येही पाणी खोलवर गेले आहे. हे पाणी आणण्यासाठीही महिलांना दूर जावे लागते.



दुष्काळावर मात करण्यासाठी गावाने पावले उचलणे गरजेचे आहे. पण त्यासाठी छोट्या गावांत एकजूट शक्य आहे. पण मोठ्या गावांत नाही. कारण तिथे वेगवेगळे राजकीय पक्ष असतात. आमच्या गावात ग्रामसभासुद्धा फक्त कागदोपत्रीच होते तर गावाची एकजूट होण्याची शक्यताच नाही.

एक टन उसामागे ८००–९०० रुपये टोल भरावा लागतो आहे. तसेच सरकारने अजूनही उसाचा भाव जाहीर केला नाही. गावात अजूनही रोजगार हमी योजना नाही. कागदोपत्री असेल तर आम्हाला माहित नाही. मला असं वाटतं की शासनाने आर्थिक मदत केली तर शेतकऱ्यांचे प्रश्न सुटू शकतात.

*माहिती संकलन – रमेश अनमोलवार, बबन गायकवाड, औरंगाबाद*

## परभणी जिल्हा

शेतीवर अवलंबून मजूर वर्ग पुण्या–मुंबईसारख्या शहरांमध्ये स्थलांतरित झाला आहे. लोकांना काम करण्याची इच्छा असूनही रोजगार नाही. गुरांना चारा उपलब्ध नाही, गुरं कवडीमोल किंमतीला विकावी लागतात. कडब्याच्या किंमती वाढल्या आहेत. आपल्या डोळ्यांसमोर हाल होऊन मरण्यापेक्षा विकलेली बरी असे वाटते. अपुऱ्या पावसामुळे सोयाबीन, कापूस, मूग, तूर या पिकांची हानी झाली. जून, जुलै महिन्यात पाऊस पडला तर पीकं नीट येतात. पाऊस सप्टेंबरमध्ये पडल्याने पानं तयार झाली पण शेंगा आल्या नाहीत. कापूस हिरवा राहिला, त्याला बोंडे आली नाहीत. जमिनीखाली ५००–७०० फुटापर्यंत पाणी नाहीये. भर पावसाळ्यात विहरी कोरड्या पडत आहेत. बोअरवेल बंद पडत आहे. दुष्काळाचे राजकारण सुरु झालंय. बीपीएल च्या यादीत मजूरदार वर्गाची नावं नसतात. ज्याला खरी गरज आहे त्याचंच नाव यादीत नसतं. गावाच्या पाटलाचे नाव बीपीएल यादीत असले तरी मी त्याविरोधात तक्रार करू शकत नाही.

दुष्काळामुळे स्त्रियांचे शोषण वाढलंय. स्त्रियांवर वेश्या व्यवसाय करण्याची वेळ आली आहे. नवरा मेल्यानंतर दुख करायलाही वेळ मिळत नाही. लेकरांच्या भविष्यासाठी पुन्हा एकदा उभं राहावं लागतं.

मला असं वाटतं की नवीन काही करण्याची गरज नाही. खूप सारे कायदे आहेत, नियम आहेत. सरकारचा लाभ तळागाळातील माणसापर्यंत पोहचायला पाहिजे. भारत निर्माण योजनेंतर्गत एका गावावर २५–३० लाख खर्च दाखवला गेला. गावात पाण्याच्या टाक्या बांधल्या, पाईपलाईनसाठी खर्च केला. २५ लाख रुपये खर्च करूनही एकही दिवस गावाला पाणी आलं नाही. दुष्काळासारख्या परिस्थितीत सरकार जर ५०० रुपयेचा चेक देणार असेल तर शेतकरी काय करेल? ही मदतही शेतकऱ्यांसाठी आहे, भूमिहीन मजूरांचे काय? गावात टँकर आला की तो प्रथम ठराविक घरामध्येच (मोठमोठ्या वाड्यांमध्ये) जातो आणि मग इतरांकडे जातो. एखाद्या घरात धान्याची १० पोती पडून असतात, पण त्यातलं एक पोत दुसऱ्याला देण्याची दानत होत नाही. मरण येत नाही म्हणून जगावं लागतं, असे दिवस आले आहेत.

*माहिती संकलन – गणपत भिसे, परभणी*

## हिंगोली जिल्हा

गेल्या चार वर्षांपासून हिंगोली जिल्ह्यात सातत्याने दुष्काळ पडत असून अन्नधान्य, चारा व पाणी टंचाई, हाताला काम नाही, यासारख्या समस्या जनतेच्या समोर आहेत. लोक कामानिमित्ताने स्थलांतर करत आहेत. खेड्यांमध्ये म्हातारी माणसे व लहान मुलांना घरी ठेऊन कामासाठी भटकंती करत आहेत. पशूधन निकाली निघत आहे. जिल्ह्यामध्ये विविध प्रकारचे तळी–मोठे प्रकल्प, विहिरींतील पाणीसाठा सातत्याने घटत असून १३ टक्केच्या खाली पाण्याची पातळी गेली आहे. पर्यायाने येत्या काळात पिण्याच्या पाण्याची भीषण टंचाई निर्माण होणार आहे. टँकरने पाणीपुरवठा करावा लागणाऱ्या गावांची संख्या मोठ्या प्रमाणावर वाढणार असून एवढे पाणी कुठून आणायचे या गंभीर प्रश्नाला तोंड द्यावे लागत आहे. बहुतांश बोरवेल बंद पडण्याच्या मार्गावर आहेत. धरणांतील पाणीसाठाही २५ टक्केपेक्षा कमी आहे. गावातील हातपंपाची पातळी बसवलेल्या पाईप लाईनच्या खाली गेली आहे. त्यामुळे हातपंप बंद पडले आहेत. मागील दोन वर्षांत पिण्याच्या पाण्याचे खाजगी स्त्रोतही कोरडे पडत गेले आहेत.

जिल्ह्यात एकूण २६ लघु पाटबंधारे असून या सर्व बंधाऱ्यामधील पाणीसाठा १५ टक्केपेक्षा कमी होत चालला आहे. जो दरमहा ५ टक्के घटत आहे. खाजगी पाण्याच्या स्त्रोतांचे अधिग्रहण करुन पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करावी लागणार आहे.

पशुसंवर्धन विभागाच्या अहवालानुसार जिल्ह्यात दुभत्या (गाय, म्हैस) जनावरांची संख्मा ३६३८७४ इतकी आहे. सध्या उपलब्ध असलेला चारा फक्त ६६ दिवस पुरेल एवढा आहे. घेतलेले कर्ज फेडू शकत नाही, या कारणामुळे आतापर्यंत जिल्ह्यात ३२ शेतकऱ्यांनी आत्महत्या केलेल्या आहेत.

जलयुक्त शिवार अभियानांतर्गत अधिकाधिक कामे करून दुष्काळाची तीव्रता कमी करण्याचा प्रयत्न केला आहे. परंतु पावसाच्या कमी प्रमाणामुळे त्याची परिणामकारकता आढळून आलेली नाही. एकूण दुष्काळाची तीव्रता लक्षात घेता जिल्ह्यातील विविध संस्था, उद्योजक आणि सी. एस. आर. विभागांनी मोठ्या प्रमाणावर आर्थिक मदतीसाठी पुढे येणे गरजेचे आहे.

*माहिती संकलन – जयाजी पाईकराव, उगम विकास संस्था, हिंगोली*

*(या सर्व जिल्ह्यांतील माहितीत विविध मुद्दे येतील आणि प्रातिनिधिक स्वरूपात माहिती पुढे येईल असा या संकलनाचे संपादन करत असताना प्रयत्न केला आहे. वाचकांच्या लक्षात येईल की अधिकाअधिक मुद्दे हे समान आहेत आणि तसे ते असणारच आहेत. परिस्थितीचं गांभीर्य लक्षात यावं आणि ही दाहकता महाराष्ट्रातील कार्यकर्त्यांपर्यंत पोचावी म्हणून काही काही ठिकाणी तपशील जसेच्या तसे ठेवले आहेत तर काहीच ठिकाणी पुनरुक्ती टाळण्याचा प्रयत्न केला आहे. माहिती संकलन आणि आपली निरिक्षणं व मत नोंदवणाऱ्या वरील सर्व कार्यकर्त्यांचे आभार..)*

पा र गा व च्या पा रा व रु न

# चुलीत घाल त्या मोबाईलला...

**नमस्कार मंडळी.. पारगाववरून बाबीचा समद्यास्नी राम राम.. पहिलं छूट समद्यांना नविन वर्षाच्या टोपलं भरून शुभेच्छा... येणारं वर्ष आनंदाचं, आरोग्याचं आणि शांततेचं आणि पुरेशा पावसाचं जावो. पाऊस आम्हा मराठवाड्यातल्या लोकांसाठी लई महत्त्वाचा बगा.. बेटा लईच ओढ दिऊ लालाय हरएक साली. असो. काय नवं जुणं? माझ्याकडं तर हाय. ह्यवका ह्यो नविन मोबाईल येटला. स्मार्ट का काय त्यो फोन. म्हणलं आपण बी काळासंगट जावं. ह्यवडं समदं जग बदलायलंय आपण बी बदलावं. पर एक सांगते माजी ही आयडिया फार काय माज्या गाववाल्या लोकायला आवडली न्हाय. म्हणले बाबे, तुला गं कशाला मोबाईल? तुला का नवरा का लेकरू? एकटी बाई तू. तू कुणाला फोन लावणार.. मंग तर म्या समद्याच्या नाकावर टिच्चून येतला. म्हणलं एकटीला सोबत नगं का... पहिला फोन लावला कमळी-मंजुळीला तर ह्यांचं काय तरी तिसरंच म्हणणं पडलं.. तुमीच ऐका...**

क. मंजुळाम्याडम हाव का घरात?

मं. हाय की. यावं पाटलीन बाई आज इकडं कुनीकडं स्वारी निघाली म्हणायची राणी सरकारांची..

क. पंजावर तुजी छाक्की अस्तियाच अं. एक शबुद बी वाया जावू द्यायची न्हाईस.

मं. कसा जावू देईल. काय बी वाया घालवायचं न्हाई असा आपला नेमच हाय. तुज्या सारखं न्हाय युज अँड थ्रो..

क. काय थ्रो केलं गं म्या. ही चप्पल चारदा शिवलेव, साडीच्या वाकळा करतेव, तुटक्या बादलीत कारल्याचा येल लावलाय, आगं इतकंच काय ही टिकली अन 'टिकलीचा' दोन्ही बी टिकवतेवंच की (दोघी हसतात). पर तू काय ऐकतच न्हाईस. कितींदा म्हणलं मोबाईल घे, मोबाईल घे. बरं तुम्ही स्वतंत्र का काय ते हाव म्याडम. सोता कमावताव. मग हाजार दोन हाजार खर्च करावे सोतावर. काय प्रोब्लेम काय हाय..

म. मोबाईल आपल्या राशीत न्हाई. चार पावलावर घर हाय, जरा चालावं माणसानं. बरं काय काम काढलस बोल. अन नवी साडी दिस्तीया बाई साहेबांची..

क. व्हय नवीच हाय. भाऊबीजेची ओवाळणी..

मं. वा वा.. चांगलीच हाय की.. भाऊबीज जोरदार झाली म्हण कि औंदा.

क. कसली जोरदार घेवून बसलीस माय.. भावाकडं दुष्काळ हाय. त्यला म्हणलं उगा खर्चात पडू नगं, भाऊबीज काय दर वर्षीच येती. तर त्यो म्हणला, 'दुष्काळ बी दर वर्षीच येतोय की गं तायडे. तू एकटी बहीण पर साधी साडीचोळी बी घडत न्हाई. हात तर किती आखडता घ्यावा. आखडू आखडू हातच थोटा व्हायची येळ आलीया. रीतभातबी तर सांभाळायला पायजेल.' मग म्या बी लई काय बोलले न्हाई.

मं. व्हय माय रीत महत्वाची! आपणबी कोणत्या चक्रात सोताला अडकवून घेताव बग. रीतभात माणसांसाठी तयार झाल्या आता त्याच आमच्या डोक्यावर बसल्या..

क. खरं हाय. ते जाऊ दे. आपल्या संगीचं ऐकलीस का..

मं. तिचं काय झालं आता?

क. (हसत हसत..) आगं तिच्या भावानं तिला भाऊबीजेला मोबाईल घिवून दिल्ता.

मं. मंग?

क. मंग काय.. सकाळी आल्ती. मला म्हणायला लागली तुला किती एमसी द्यायचे.. फोनच उचलीत न्हाईस..

मं. (हसते) एम सी? आता ही काय भानगड?

क. आगं एमसी. म्हंजी मिसकॉल.. मला बी नवंच कळलं.

मं. आता काय करावं माय ह्या एमसीला. एक एमसी कमी होती का आता ही नवी आली.

क. तुझं बरं हाय. तू मोबाईलच वापरत न्हाईस..

मं. बग वाचले कि न्हाई ह्या नव्या एमसीच्या कचाट्यातून. (हसतात) पर ह्या मोबाईलनं कहरच केलाय बग. निस्ता ऊत आणलाय. ज्याला बगावं त्यो मोबाईल घिवून फिरतोय. गांडीला ठिगळ लावतेल, बापाच्या अंगातल्या बनेनीला हजार भोकं पडलेत, माय काट्याकुट्यातून आनवणी भारे बांधून आणतीया, अन हे दिवटे आयत्या मोबाईलवर रेघोट्या वडणार..

क. म्हंजी तुला काय वाटतंय फकस्त श्रीमंतानीच मोबाईल वापरावं का काय मंजुळे.

मं. आगं तसं न्हाय. पर धा–बारा हजाराचा मोबाईल घेतेत अन घरात सादा संडास बांधावा वाटूने का गं.. तरणे ताठे बापे लोकांचं बराय.. जातेत पावडरी लावून टेचात हगायला, बागेत चालल्यावणी. पर पावसापाण्यात म्हातारे कोतारे, पोरीबाळी, लेकरांची किती आपदा गं. त्याचा इचार कुणाला हाय का?

क. आगं ते सोड. आपली सुली हाय ना, तिच्या दिराच्या, आपल्या विश्वासच्या गं, लग्नाची गंमत ऐकलिस का?

मं. हे बग कमळे, सुली एकवेळ मी म्हनंल आपली हाय पर तिचा दीर काय आपला न्हाय बाबा. निदान माझा तर न्हाय.

क. तुझ्या जीबंला काय हाड मंजुळे. जावू दे माय..

मं. बरं बरं सांग तुझ्या, आपलं.. सुलीच्या दिराच्या लग्नाची गंमत. सांग..

क. ह्यो नवरदेव हुबा होता मांडवात.. लग्नाला...

मं. नवरदेव मांडवात लग्नालाच हुबा रहातो कमळे, गोट्या खेळायला न्हाई.


क. आता तू मला बोलू देतीस का जरा.. तर झालं काय कि त्याच्या दोस्तांनी, पोरासोरानी भरीस घातलं त्यला. सासऱ्याला फोन माग म्हणून. मोबाईल, त्यो बी काय ते म्हणतात स्मार्ट फोन का काय ते..

मं. मंग

क. मंग काय. हाटूनच बसला. मारुतीला जात न्हाई म्हनला.. मुंडावळ बंधू दिना गेला. सासरा बिचारा पाया पडाया लागला. म्हणला, आता ह्या येळेला गावात काय मिळणार, उद्यापरवा आणून देतो.. तर हा काय ऐकिनाच झाला. म्हणला गाडीवर धाडा कुणालातरी. तालुक्यावरून यील एका तासात. मग जातो मारुतीला..

मं. ह्यला लगीन पोरीशी करायचं व्हतं का मोबाईलशी..

क. अगं पुढं ऐक काय मज्जा झाली. ह्याच्या बापाला, म्हंजी आपल्या.. म्हंजी सुलीच्या.. नानाला जवा कळलं कि पोरगा असा कराया लागलाय तवा नानाची सटकलीच. त्यनं हळूच विश्वासला अन त्यच्या दोस्तानला एका रूममदी न्हेला अन असा काय झाडला म्हणतीस. म्हणला, पाच पैशाची अक्कल न्हाई, एखादं काम धड करत न्हाईस,



सुधरशील म्हूनून लगीन लावून दिवू लालाव, खरतर त्या पोरीच्या पदरात इस्तुच बांधू लालाव. त्यच्यावर तुजे हे नखरे. गपगुमान मारुतीला जा न्हाय तर समदा जनम मारुतीच्या देवळात काढावा लागंल.. स्मार्ट फोनकडं बगंत...

मं. मंग गं.. बापाचंतर ऐकलं का न्हाय.. माज्यातर डोळ्यासमोरच येतोय विश्वास. मारुतीच्या देवळात स्मार्ट फोन बरुबर..(हसतात)

क. न ऐकून जातो कुटं! गप आला खाली मान घालून. सासऱ्याची माफी मागितली अन गेला मारुतीला.

मं. न्हाई तर काय. मारुती आन मोबाईल सोबत संसार करायचा म्हंजी अवघडच हाय आं.. अन बाप्यांसाठी खासकरून... (परत हसतात) पर तुला एवढं समदं कसं काय म्हाईत कमळे. आसं सांगतीयास जसं काय तुज्या डोळ्यासमोरच घडलंय हे समदं..

क. आगं डोळ्यासमोरच घडलंय म्हणून तर सांगूलालेव. हे समदं बोलणं आपल्या, म्हंजी पाटलाच्या सुभानरावनं मोबाईल वर काढलं आन धाडलं आमच्या ह्यांना.. त्यांनीच ऐकीवलं मला.

मं. काय लोक बी येडे झालेत ह्या मोबाईल च्या नादानं.. मोबाईल म्हणजे एक शरीराला अवयवच उगवल्यासारखा झालाय बग..

क. खरंच हाय अन त्यो बी फेवरेट अवयव.. जवा बगावं तवं हातात हाईच..

मं. पर एक सांगू का कमळे ह्या मोबाईलचा कितीबी फायदा असू दे पर कानावर जे पडतंय त्याच्यानं लईच घाबरायला होतंय बग..

क. का गं..

मं. आगं कालचीच घटना ऐक. लातुरात एका पोरीनं जाळून घेतलं. माज्या नंदंच्या शेजारनीची पोरगी. बारावीला शिकत हुती. कुठल्यातरी पोराच्या प्रेमात पडली. ह्यानं मोका साधून घात केला बग..

क. काय केलं गं?

मं. आगं त्यानं बेसावध असताना तिचं शुटिंग काढलं म्हणतेत. ते समद्यायला दाखविन म्हणून धमकावित होता. तिला नाय नाय ते करायला लावित होता, तिच्या मनाविरुद्ध. किती वेळ सहन करणार ती बिचारी.. कुणाला सांगणार अन काय सांगणार.. घेतलं जाळून स्वतःला..

क. सोताला जाळण्यापरीस त्यलाच का न्हाई जाळला म्हणते मी. ही कुठली रीत झाली गं वागण्याची.. अन भरोसा, विश्वास नावाची काय गोष्ट असती का न्हाई म्हणायची..

मं. ह्या समद्या नंतरच्या गोष्टी कमळे, अन त्याबी आपल्यासाठी.. जीव त्या पोरीचा गेला तो गेलाच. एवढं होवून तो पोरगा नामानिराळा राहिला कारण त्यनं असं झाल्या झाल्या ते शुटींग क्यान्सल केलं म्हणतेत मोबाईलवरून..

क. मला तर काय बी सुचत न्हाय बग.. मागं ती तशीच एक गोष्ट घडली तवाबी माजी तळ पायाची आग मस्तकात गेल्ती बग..

मं. कोणती ग?

क. आगं ते न्हाई का, असंच एक कवळ्या वयातलं जोडपं रस्त्यात गाडी लावून बसल्तं अन कुठल्यातरी संस्कृतीचा ठेका घेतलेल्या संघटनेच्या पोरांनी त्यांना मारहाण केली. बर एवढ्यावर ते थांबले न्हाईत तर ह्याचं शुटिंग काढलं अन पाठवलं समद्या जगाला. ती पोरगी तर म्हणं बेपत्ताच झाली त्या घटने नंतर.. काय झालं असंल तिचं देवजाणे..

मं. देव कशाला पायजेल.. तिच्या घरचे आन पोलीसजाणे म्हण.. काय म्हण कमळे, ह्या इज्ञानानं लई मजल मारली बग थोड्या काळात. माणसाचं जीवन बी लई सुधारलं. लई इकास का काय केला हे बी खरंच म्हणायला पायजेल. पर माजं एक मत हाय, नेहमीचंच बायांचं रडगाणं म्हण पायजेल तर. पर हे इज्ञान, काय म्हणतेत ते तंत्रज्ञान बहुतेक येळी बाईच्याय मुळावर का उठतं तेच कळत न्हाई बग.. काय बी चिमित्कार करा, टीवीसिनेमा आणा बाईचं शरीर इका, सोनोग्राफी आणा बाईला जन्मालाच इवू दिवू नका, मोबाईल फिबाईल आना पोरीबाळींचे फोटो काढा, पसरवा, इका, त्यांना छळा. समद्या गोष्टी येवून बाईच्या शरीरापर्यंत थांबणार. त्यांना म्हणणार गप गुमान वाक, वाग, जग न्हाई तर मर.. ह्यातली कुठलीच गोष्ट बाईच्या हातात न्हाई, त्यांच्यासाठी सोपी न्हाई, सुरक्षित न्हाई.

क. खरं हाय तुजं म्हणणं. ह्याला काय अंत बी दिसत न्हाय.

मं. पर तुला मला अंत हाय.. त्या बघ आत्या इकडंच निघाल्यात वाटतं तुला बोलवायला.

क. म्हणून तर म्हणते तू घे एकांदा मोबाईल, घे त्यचा ताबा अन वापर तुला पायजेल तसा..

मं. अन काय तुला एमसी देवू का रोज रोज. चुलीत घाल त्या मोबाईलला...

## नववर्ष...

नव्या वर्षाच्या नव्या उत्साहात
बहरून येऊ दे उजाड जागा
विणित जाऊ दे मनामनातील
सुंदर हळवा रेशीम धागा...



\- प्राजक्ता धुमाळ

दृष्टीक्षेपात

# मुंबई-पुणे-मुंबई २

## एक प्रतिक्रिया

'मुंबई-पुणे-मुंबई' आणि त्याचाच दुसरा भाग असलेला 'मुंबई-पुणे-मुंबई २' हे दोन्ही चित्रपट आपण एव्हाना पाहिले असतीलच. नुकताच प्रदर्शित झालेला सतीश राजवाडे दिग्दर्शित 'मुंबई-पुणे-मुंबई २' हा चित्रपट वरवर पाहता एका लग्नाची गोष्ट वाटते. गौतम आणि गौरी हे या चित्रपटाचे नायक-नायिका आहेत आणि त्यांच्या लग्नाच्या गोष्टीभोवती हा चित्रपट गुंफलेला आहे. नवरा म्हणून पसंत पडलेला गौतम आणि त्यानंतर हा की तो, हो की नाही असा गौरीचा उडालेला गोंधळ, तिची गौतम आयुष्यात येण्याआधीच्या प्रेमाच्या नात्यातली गुंतागुंत, या सगळ्या गोंधळाविषयी तिचा जवळच्या व्यक्तींशी होणारा संवाद हे सारे पैलू तिच्या जोडीदार निवडीच्या अधिकाराशी, निर्णयाशी जोडलेले दिसतात आणि म्हणूनच ते भावतातही. यात मुंबईकरांवर आणि पुणेकरांवर केलेले विनोद यामुळे हा चित्रपट मजेशीर तर बनला आहेच, पण त्याबरोबरच गौतमचे पुढारलेले, मोकळेपणाचे विचार, गौरीच्या आधीच्या प्रियकराने, अर्णवने तिला स्वतंत्रपणे निर्णय घेण्यासाठी दिलेली स्पेस, वडिलांनी तिच्या निर्णयाला दिलेली साथ अशा विविध पैलूंमुळे परंपरागत विचारांच्या चौकटी तोडून पुरोगामी विचारांच्या दिशेने जाणारा हा सिनेमा म्हणूनच वेगळा वाटतो.

' मुंबई-पुणे-मुंबई २' हा सिनेमा म्हणजे लग्न ठरल्यापासून ते लग्न होईपर्यंतचा काळ! या काळात, चित्रपटातील गौतम आणि गौरी ही एकदम परस्परविरोधी जोडी, एकमेकांना समजून घेण्याचा, संवाद साधण्याचा, एकमेकांशी व कुटुंबाशी जुळवून घेण्याचा कसा प्रयत्न करतात ते दाखवले आहे. मुलीला लग्न करून सासरी जाताना वाटणारी हुरहूर, आपले घर सोडून जाण्याचे दुःख, आपला जीवनसाथी व त्याचे कुटुंबीय यांच्याबरोबर आपण कसे जुळवून घेणार याची अनामिक भीती हे अगदी सर्वसामान्य वाटते.

पण चित्रपटाच्या तळाशी जाता, नातेसंबंध, त्यातील पारदर्शकता तसेच गुंतागुंत, लग्नानंतर मुलगा व मुलगी यांच्यावर असणारा दबाव, जबाबदाऱ्या, लैंगिकतेच्या गैरसमजुती, स्त्री-पुरुष समानता, दोन पिढ्यांमधील समंजसपणा यांसारख्या अनेक मुद्द्यांवर हा चित्रपट अंतर्मुख करतो.

आपल्या समाजामध्ये लैंगिकतेच्या गैरसमजुती अगदी खोलवर रुजलेल्या आहेत. पुरुषांनी कसे वागावे आणि स्त्रियांनी कसे वागावे याचे काही अलिखित नियम बनले आहेत. एखादी स्त्री अथवा पुरुष समाजाने ठरवून दिलेल्या साच्यामध्ये जर राहत नसेल तर त्यांना दोषी ठरवले जाते. या चित्रपटात मात्र आश्चर्यकारकरित्या गौरीचं दारू पिणं, तिचं आधीचं रिलेशनशिपमध्ये असणं, आधीच्या मित्राबरोबर काम करणं आणि अशाच इतर गोष्टी गौतम आणि त्याचे कुटुंबीय अगदी सहजपणे स्वीकारतात. लग्नाच्या आधी गौरीची आई आणि गौरी पहिल्यांदा सासरच्या घरी आली आणि तेव्हा गौरी अचानक गाणं म्हणायला लागली. तेव्हा तिची आई याबद्दल सासरच्यांची माफी मागते, यावरही गौतमचे कुटुंबीय उलट तिचं कौतुक करतात. मुलगी आहे म्हणून तिनं स्वतःला विशिष्ट चौकटीतच ठेवले पाहिजे याला फाटा पाडून चित्रपट एक नवा विचार देताना दिसतो.

गौरी हे पात्र अत्यंत गोंधळलेले, रागीट, अस्वस्थ, अशा प्रकारे रंगवलेले आहे. तिच्या मनामध्ये सतत असुरक्षिततेची भावना दिसून येते. लग्न हा आयुष्यातील खूप महत्वाचा निर्णय, आई-वडिलांना सोडून जाण्याचं दुःख, आत्तापर्यंत स्वतंत्रपणे वागण्याची सवय, लग्न झाल्यानंतर आयुष्यात होणाऱ्या बदलांचा एक अनामिक ताण तिच्यावर




*चित्र : इंटरनेटवरुन*

जाणवतो. तिच्या आधीच्या बॉयफ्रेंडचं अर्णवचं, तिच्या आयुष्यात येणं, त्याची होणारा जीवनसाथी गौतमबरोबर तुलना, सगळेच पुरुष कन्फर्मेशन नंतर बदलतात हा गैरसमज तिच्या अस्वस्थतेमध्ये अधिकच भर टाकताना दिसतो. काही प्रसंगातून गौतम तिला गृहित धरतोय, तिच्या वेळेला आणि कामाला महत्त्व देत नाही असं तिला जाणवायला लागतं. लग्नाचा आपला निर्णय बरोबर आहे की चूक हे पडताळून पाहण्यासाठी ती गौतमकडे वेळ मागते. एकीकडे स्वतंत्रपणे विचार करून निर्णय घेण्याची धडपड तर दुसरीकडे मी जर असं वागले तर काय होईल, कुटुंबीय आणि इतर नातेवाईक काय विचार करतील याचा ताण यामुळे गौरी तिची द्विधावस्था तिच्या पालकांजवळ व्यक्त करू शकत नाही.

गौरीला स्वतःचे स्वतंत्र विचार असणे ही गोष्ट चांगलीच वाटते; पण त्याचबरोबर तिचे स्वतंत्र विचार जपत असताना घरच्यांच्या तिच्याकडून असणाऱ्या अपेक्षा पूर्ण करतानाची घालमेलही दिसते. गौरीची मैत्रीण व मावशी यांना गौरीच्या मनातील गोंधळ, अगदी तोंडावर आलेलं लग्न मोडण्याची शक्यता या गोष्टी माहित असतानाही त्यांचं तिच्याबरोबर असणं, आपलं मत तिच्यावर न लादता तिला स्वतंत्रपणे विचार करण्यासाठी स्पेस देणं; जेव्हा तिच्या वडिलांना तिच्या या निर्णयाबद्दल समजते तेव्हा त्यांनी स्वतःचा किंवा समाजातील इतर लोक काय म्हणतील याचा विचार न करता आपल्या मुलीच्या पाठीशी ठामपणे उभं राहणं खूपच भावतं.

सामान्यतः लग्नामध्ये असणारा हुंडा, देणं-घेणं, मानपान, रुसवा-फुगवा या गोष्टी जरी चित्रपटातील लग्नामध्ये नसल्या तरी प्रतिष्ठा, कुटुंबियांच्या आणि इतर नातेवाईकांच्या अपेक्षाचं ओझं याचा ताण असतानाही गौरीच्या निर्णयाचा आदर करत तिच्यावर कोणतीही गोष्ट न लादता तिच्या पाठीशी ठामपणे उभे राहणारे वडील खूप आदर्श वाटतात.

आजही स्त्री भ्रूण हत्या होणाऱ्या आपल्या समाजामध्ये मुलीचं लग्न म्हणजे पालकांसाठी एक तणावाचा विषय आहे. आजही बऱ्याच कुटुंबांमध्ये मुलीच्या अपेक्षांचा, इच्छांचा व निर्णयाचा विचार न करता मुलीचे लग्न उरकले म्हणजे एक जबाबदारी (कटकट?) गेली म्हणून बरेचसे पालक हुश्श करताना दिसतात. बऱ्याचदा मनासारखा जीवनसाथी नसतानाही तिच्यावर 'लग्न' लादले जाते. लग्न ठरवण्याच्या प्रक्रियेमध्ये आपल्या मुला-मुलींना काय वाटते यापेक्षा 'लोग क्या कहेंगे' या आजाराला बळी पडून मुला-मुलींच्या विरोधात जाऊन लग्न ठरवले जाते. परिणामी, पुढे जाऊन त्यांना त्यांच्या वैवाहिक जीवनामध्ये अडचणींना तोंड द्यावे लागते. या चित्रपटामध्ये मात्र मुलांना काय वाटते याला जास्त महत्व दिल्याचे जाणवते.

'उठा ले जाऊंगा',' तू हा कर या ना कर' असा विचार करणारे बरेचसे 'महाभाग' आजही आपल्याला समाजामध्ये दिसतात. मुलीची संमती, इच्छा असो अथवा नसो, आपल्याला आवडणारी मुलगी मिळवणे म्हणजे आपण पुरुष म्हणून जन्माला आलो तेव्हाच आपल्याला मिळालेलं लायसन्स आहे आणि असं केल्याने आपण पुरुषार्थ गाजवला असंच त्यांना वाटतं.

या चित्रपटात मात्र, कुटुंबियांचं आणि समाजाचं लग्नावर जवळजवळ शिक्कामोर्तब झालेलं असतानाही कोणीतीही गोष्ट गौरीवर न लादता, तिच्या निर्णयाचा आदर ठेऊन आपलं प्रेम व्यक्त करण्याचा प्रामाणिक प्रयत्न करणारा गौतम खरंच खूप भावतो. आपलं लग्न ठरलंय, एवढा खर्च झालाय, घरचे काय म्हणतील? नातेवाईक काय म्हणतील? यांसारखे अनेक दबाव असूनही तो तिला तिच्या निर्णयाचा स्वतंत्रपणे विचार करायला वाव देतो. त्याच्यावर असणाऱ्या दबावांचं भांडवल करूनही तो तिला कदाचित लग्नासाठी तयार करू शकला असता. पण तो सातत्याने तिच्यावरचं प्रेम तिला कसलाही त्रास न देता व्यक्त करताना गौतम एक नवा आदर्श निर्माण करताना दिसतो.

या चित्रपटामधील अर्णव (गौरीचा आधीचा बॉयफ्रेंड) या पात्राबद्दल प्रेक्षकांमध्ये सामान्यतः सगळं व्यवस्थित होत असताना आता हा कशाला मध्ये आला? अशी प्रतिक्रिया तयार होते. पण अर्णवसुद्धा, 'तीन वर्षे रिलेशनशिप होतो म्हणून तू माझ्याबरोबरच लग्न केलं पाहिजे' अशी कोणतीही जबरदस्ती न करता तोही तिच्या निर्णयाचा आदर करतो..

प्रत्येक व्यक्तीला आपण आपले आयुष्य कसे व कोणाबरोबर व्यतीत करायचे याचा स्वतंत्रपणे निर्णय घेण्याचा अधिकार आहे, मग तो मुलगा असो वा मुलगी. तसेच आपले प्रेम प्रामाणिकपणे व्यक्त करण्याचाही अधिकार आहे. पण हे करताना फक्त आपल्याला वाटते म्हणून आपण इतरांवर आपल्या इच्छा लादत तर नाही ना हा विचार प्रत्येकाने करण्याची गरज आहे. मुलीची संमती, इच्छा असो अथवा नसो, आपल्याला आवडणारी मुलगी मिळवणे म्हणजे आपण पुरुषार्थ गाजवला हा गैरसमज दूर करून समोरच्या व्यक्तीच्या विचारांचा आणि मताचा आदर केला गेला पाहिजे. मुलगी किंवा मुलगा यांचा निर्णय म्हणजे अंतिम निर्णय, कारण त्यांना त्यांचे आयुष्य कसे व कोणाबरोबर व्यतीत करायचे आहे हे ठरवण्याचा अधिकार आहे हा विचार रुजण्याची खरोखरीच खूप गरज आहे. यांसारखे अनेक सकारात्मक मुद्दे, विचार आणि दृष्टीकोन या चित्रपटातून समोर येतात.

**- गौरी बोबडे**

शरीरसाक्षरता

# मतिमंद मुलं-मुली आणि वयात येणं...


किशोरावस्था हा संवेदनशील कालखंड जसा सामान्य मुलांच्या आयुष्यात महत्वपूर्ण असतो, तसाच तो कोणत्याही कारणाने अपंगत्व असणाऱ्या मुला-मुलींसाठीही महत्वपूर्ण असतो. सामान्य मुलांप्रमाणेच या मुला-मुलींमध्येही किशोरवयात शारीरिक, मानसिक बदल होऊ लागतात. पण बुध्दीची वाढ झालेली नसल्यामुळे योग्य पध्दतीने भावना व्यक्त करण्याची समज आलेली नसते. मुलांचा अधिकाधिक वेळ शाळेत जात असल्यामुळे त्यांच्या वागण्या-बोलण्यात होणारे बदल शिक्षकांच्या लक्षात येत असतात. त्यामुळे साहजिकच या काळात शिक्षकांची जबाबदारीही वाढलेली असते. मतिमंद मुला-मुलींच्या किशोरावस्थेला विशेष शाळांतील शिक्षक-शिक्षिका कशा प्रकारे प्रतिसाद देतात हे एका शिक्षकाच्या शब्दांतच समजून घेऊया...

मतिमंद व्यक्तींपैकी जवळ–जवळ ५० ते ६० टक्के व्यक्तींमध्ये वर्तन समस्या असतात. त्यामुळे पालक आणि शाळा यांच्यावर बरीच जबाबदारी असते आणि कधी कधी त्याचा ताणही येतो. अशा मुलांसाठी शालेय कार्यक्रम राबवताना शाळांना खूप अडचणींचा सामना करावा लागतो. कधी कधी या समस्यांचे आकलन चूकीच्या पद्धतीने केल्यामुळे व परिस्थिती चूकीच्या पद्धतीने हाताळल्यामुळे समस्या दूर होण्याऐवजी त्या अत्यंत जटील बनत जातात व परिस्थिती हाताबाहेर जाऊ शकते. शाळेत या मुलांबरोबर काम करण्याऱ्या शिक्षक व सहकाऱ्यांना अशा प्रसंगी तणावाचा सामना करावा लागतो. मुलांसाठी ठरलेला शैक्षणिक कार्यक्रम राबवायचा की त्यांच्या वर्तन समस्या हाताळण्यात सर्व शक्ती खर्च करायची असा गंभीर प्रश्न शाळांना, विशेषतः शिक्षकांना पडतो. मुलांच्या या वर्तन समस्यांकडे डोळेझाक करत व त्याचे योग्य असे निराकरण न करता त्यांना शिकवत राहायचे म्हणजे परिस्थितीचे गांभिर्य हरवण्यासारखेच आहे. तेव्हा अशा वर्तनाशी संबंधित अव्हानांचे योग्य निराकरण करणे यालाच प्रथम प्राधान्य द्यावे लागेल. विशेषतः वयात आलेल्या मुला–मुलींच्या गरजा व त्यांच्याकडून या बदलांना दिला जाणारा प्रतिसाद, त्यातून होणाऱ्या त्यांच्या विशिष्ट वर्तनाकडे अधिक संवेदनशील व विचारी पद्धतीने पहाणे क्रमप्राप्त आहे.

आधुनिक विचार प्रवाहानुसार मुलांच्या अशा वर्तनाकडे समस्या म्हणून न पाहता एक वर्तन अवस्था म्हणून पाहणे गरजेचे आहे. समस्या म्हटलं की आपोआपच नकारात्मक दृष्टीकोन येतो. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या प्रगतीमध्ये अडथळा येण्याची शक्यता असते. मुला–मुलींच्या वर्तनामागे अनेक कारणे असतात. आजूबाजूचे वातावरण, परिस्थिती, प्रसार माध्यमे, वयानुसार मुलांमध्ये होणारे शारीरिक, भावनिक बदल इत्यादीमुळे विविध प्रकारचे वर्तन घडत असते.



चित्र : सुषमा दुर्वे



चित्र : सुषमा दुर्वे

यासाठी शाळा काय करू शकते? तर शाळा आपल्या आवाक्यातील परिस्थिती बदलण्याचा प्रयत्न करू शकते. समाजातील वातावरण, प्रसार माध्यमे याबाबत शाळेची तशी काही भूमिका नसली तरी कौटुंबिक वातावरण योग्य राहण्यासाठी शाळेमार्फत पालकांना मार्गदर्शन करता येईल. मुलांचे वर्तन अधिक जबाबदार किंवा अपेक्षित सामाजिक नियमांनुरुप घडवून आणण्याच्या दिशेने शाळा पातळीवर काही कार्यक्रम राबवता येतील. मुलांनी मुलींना चिडवणे, एकमेकांना खाणाखुणा करणे, एकमेकांचं साहित्य लपवणे, कागदावर किंवा भिंतीवर एकमेकांची नावं लिहिणे, एकमेकांना स्पर्श करणे, ढकलणे; अशा प्रकारच्या कृती मुलं-मुली विशेषतः वयात आलेली मुलं-मुली करतात. अशा वेळेस त्यांना अपमानित न करता किंवा त्यांच्या स्व प्रतिमेला तडा जाईल अशा प्रकारची शेरेबाजी न करता कौशल्याने असे प्रसंग हाताळावेत. कारण वयात येताना होणाऱ्या बदलांचा आविष्कार त्यांच्या वागण्यातून घडत असतो. आपण एक शिक्षक म्हणून याकडे सकारात्मक दृष्टीकोनातून आणि जबाबदारीणे पहाणे गरजेचे असते. एखाद्या वर्तनाचा जर अतिरेक होत असेल तर शाळा पातळीवर काही सुधारणा कार्यक्रम राबवावेत. उदाहरणार्थ, मुला-मुलींचे एकत्रित खेळ, प्रश्नमंजुषा, कोडी, आवडता गृहपाठ देणे, एकत्रितपणे मातीकाम, कोलाज काम, चित्रकला, डान्स असे उपक्रम घेता येतील, मुला-मुलींचा गप्पांचे अनौपचारिक कार्यक्रमही घेता येतील. यामुळे मोकळेपणाचे वातावरण निर्माण होऊन मुला-मुलींच्या वर्तनामध्ये सकारात्मक बदल घडून येण्यास मदत होईल.

*सुभाष कळसे, शिक्षक*
श्री. पी. सी. अलवाणी मतिमंद मुलांची शाळा,
वाई, जि. सातारा.

**PRINTED MATTER** **बुक पोस्ट**

प्रकाशक प्रति

**तथापि ट्रस्ट**
रेणुप्रकाश ए, तिसरा मजला
बॅ. गाडगीळ रस्ता, नागनाथ पाराजवळ,
८१७, सदाशिव पेठ, पुणे ४११०३०
दूरध्वनीः ०२० २४४३११०६/२४४३००५७
Email: tathapi@tathapi.org
Website: www.tathapi.org

अंकातील प्रत्येक मताशी तथापि संस्था सहमत असेलच असे नाही. अंकाचा व संस्थेचा उल्लेख करून कोणालाही या अंकातील माहितीचा वापर करता येईल.

पारगावच्या पारावरुन चित्रः राजू देशपांडे

**जिव्हाळा देणगी वर्गणी: वार्षिक - रु. ३५, तीन वर्षासाठी - रु. १००** **खाजगी वितरणासाठी**